संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पाणी मिळत नाही तर दारु प्या

अवघा महाराष्ट्र दुष्काळाच्या वणव्यात होरपळतो आहे. काही मोजका भाग वगळला तर अक्षरशः त्या राज्यातली ७५ टक्के जनता पिण्याच्या पाण्यासाठी तहानलेली आहे. अगदी ज्या ज्या ठिकाणी मोठ्या धुमधडाक्यात महानगर पालिकांची निर्मिती केली गेली. त्या महानगरांमध्येसुध्दा पाण्याचे महासंकट तयार झाले आहे. कुठे सहा दिवसांनी तर कुठे दहा दिवसांनी मनमाडसारख्या शहराला तब्बल महिन्याभराने स्थानिक नगरपालिकेकडून पाणीपुरवठा होत आहे. अशाही परिस्थितीत राज्य सरकारने शिवछत्रपतींच्या शिवराज्यभिषेक दर्शनाचे स्मरण ठेवावे. त्याचा जंगी सोहळा साजरा करावा पण महाराजांनी त्यांच्या काळात पाण्याच्या साठवणीला किती महत्त्व दिले होते याकडे सरकारने दुर्लक्ष करून लोकांना व्यसनाधिन करणाऱ्या योजनांचे गोडवे गावेत हा आणखीनच धक्कादायक प्रकार ठरतो. आज राज्यात पाण्याची एवढी भीषणता असताना राज्य सरकारच्या डोक्यामधून जेव्हा चित्रविचित्र योजनांची घोषणा होते त्यावेळेला कपाळावर हात मारून घेण्याशिवाय पर्याय उरत नाही. कोणती घोषणा कोणत्या काळात करावी, राज्याची सध्या परिस्थिती काय आहे. अगदी सरकार, जनता दोघेही दुष्काळाच्या समस्येशी संघर्ष करीत आहेत. यंदाचा पाऊस लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठिकठिकाणी असणारे धरणांमधले पाणीसाठे शेवटच्या घटका मोजू लागले आहेत. असलेले पाणी वाचवायचे कसे आणि वाचलेले पाणी निदान जून महिना संपेपर्यंत पुरवायचे कसे अशा कचाट्यात त्या त्या ठिकाणची जिल्हा प्रशासने सापडली आहेत. निदान यावेळचा दुष्काळ हा १९७१ च्या दुष्काळापेक्षाही कडक असल्याचे स्पष्ट झाले असताना या काळात लोकांना दिलासा मिळेल आणि पाणी हाच एक विषय कसा प्राधान्य क्रमावर राहील याचा विचार राज्याच्या सर्व मंत्र्यांनी करणे अपेक्षित आहे. परंतु अलिकडचे राज्याचे उत्पादनशुल्क मंत्री श्री बावनकुळे यांनी अचानकपणे एक घोषणा केली की पुढच्या वर्षभरात सरकार दारूविरहित दिवसांची संख्या कमी करणार आहे म्हणजेच काही निमित्त आणि प्रसंगांच्या अनुषंगाने त्या त्या दिवशी दारुविक्रीला परवानगी दिली जात नाही त्याला सरकारी भाषेत ड्राय डे असा त्याचा आवर्जून उल्लेख केला जातो. शिवाय यंदाच्या वर्षभरात राज्य सरकारला सर्वाधिक महसूल देण्याचा विक्रम राज्यउत्पादन शुल्क विभागाने केला. पंचवीस ते तीस हजार कोटीचा महसूल मिळाल्यानंतर आता पन्नास हजार कोटीपेक्षा जास्त महसूल मिळवण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

## दारुचा महापूर

दारुविक्रीवरच्या करातून सरकारला सर्वाधिक उत्पन्न मिळाल्याचा त्यांच्याकडून झालेला हा गौरवपूर्ण उल्लेख त्यांच्यासाठी महाराष्ट्राची शान वाढवणारा दिसतो आणि अशा परिस्थितीत राज्यातील ड्राय डे कमी करून लोकांनी अधिकाधिक दारू प्यावी, पर्यायाने राज्यातील दारूचा खप वाढावा, विक्री वाढावी आणि राज्यसरकारचे दारुवरच्या विक्री करातून मिळणारे उत्पन्न दुथडी भरून वाहू लागावेत अशी या बावनकुळे महाराजांची इच्छा दिसते. निदान वेळ, काळ, प्रसंग पाहून तरी या निर्णयांची माहिती देण्याचे भान त्यांनी ठेवले असते तरी महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेला ते शोभेसे झाले असते. पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे किंवा दुष्काळाच्या वेदनेने आज जवळपास सगळा महाराष्ट्र अक्षरशः विव्हळत असताना बावनकुळेंना राज्यात दारूचा महापूर निर्माण व्हावा अशी इच्छा व्हावी हा या राज्याचा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. याचा अर्थ राज्यात दारू कारखान्यांसाठी भरपूर पाणीपुरवठा करायला सरकारकडे पाणी उपलब्ध आहे. असे सिध्द होते. शिवाय पाणी मिळत नसेल तर दारू प्या पण महाराष्ट्राचे महसूली उत्पन्न वाढवा असादेखील त्यांचा या सगळ्या निर्णयाचा रोख स्पष्टपणे दिसून येतो. राज्यातील नदी, नाले विहीरी, कोरडे ठणठणीत म्हणजे ड्राय होत असताना दारु पिणाऱ्यांसाठी ड्राय डे कमी करण्याचा बावनकुळेंचा विचार पाण्याला दारुचा पर्याय उपलब्ध करून देणाराच म्हणावा लागतो. आज राज्यात कोकाकोला बनवणाऱ्या कंपनीला होणारा पाणीपुरवठासुध्दा अखंडीत सुरु आहे. त्याचा सरकारला पैसा मिळतो ही गोष्ट खरी. पण ज्या ठाणे जिल्ह्यातल्या वाडा परिसरात कोकाकोलाची निर्मीती होते त्याच ठाणे जिल्ह्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. प्रत्यक्ष वाडा शहराला शुध्द पाण्याचा पुरवठा होत नाही म्हणजे इथेसुध्दा पाणी मिळत नसेल तर शीतपेय प्या असे म्हणण्यासारखीच स्थिती दिसते. खरे तर अशा दुष्काळजन्य परिस्थितीत सर्व प्रकारच्या चैनीच्या वस्तू उत्पादनांकरीता लागणारा पाणीपुरवठा एकतर बंद केला पाहिजे नाही तर निम्म्यावर आणला पाहिजे. परंतु पाणी विकून पैसे मिळतात. दारु विकून उत्पन्न वाढते. अशा मानसिकतेत वावरणारा राज्य सरकारच्या कारभाराचा हा नमुना पाहिल्यावर आश्चर्याचा धक्का बसतो हे निश्चित.

## दारुयुक्त शिवार

अशी ही सगळी मंत्रीस्तरावरची योजनांची किंवा कल्पनांची भयंकर अवस्था पाहिल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सुरु केलेली जलयुक्त शिवार योजना किती फसवी आहे यावरही शिक्कामोर्तब होते. कारण मुख्यमंत्र्यांना हवे आहे जलयुक्त शिवार आणि बावनकुळेंना हवे आहे दारुयुक्त शिवार आता यापैकी कोणाला प्राधान्य द्यायचे या निर्णय मुख्यमंत्र्यानीच करायला हवा. कारण जलयुक्त शिवार मधून फक्त पैसाच खर्च झाला. उत्पन्न मिळालेले नाही. तर याउलट दारु विक्रीतून सरकारला प्रचंड कर मिळतो. आणि आता दारु उत्पादन शुल्कातून त्याचे नवे विक्रम प्रस्थापित करण्याचा राज्य सरकारचा हेतू दिसून येतो. एकीकडे चंद्रपूरसारख्या जिल्ह्यात दारु बंदीचा प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून याच सरकारमधले एक मंत्री प्रयत्न करतात. परंतु सरकारच्या अधिकृत धोरणानुसार राज्यभर दारुचा महापूर निर्माण करून विक्रमी महसूल मिळवण्याचे उद्दीष्ट निश्चित केले जाते. हा परस्पर विरोधी प्रकार राज्याच्या सामान्य जनतेच्या कल्याणाचे तीन तेरा करणारा आहे.महाराष्ट्राच्या कल्याणाचे तोरण ज्यांनी बांधले त्या शिवछत्रपतींच्या शिवराज्याभिषेकाचा सोहळा रायगडावर पार पडत असताना राज्य सरकारला दारुविक्रीतून सर्वाधिक महसूल मिळवण्याचे डोहाळे लागावेत यासारखी पुरोगामी महाराष्ट्रासाठी दुसरी लांच्छनास्पद गोष्ट कुठलीही नाही.